# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाला सादर करण्यासाठी प्रस्तुत शोधनिबंधाचा अभ्यास करताना मला ज्यांचे सहकार्य मिळाले त्यांचा ऋणनिर्देश करणे मी आद्यकर्तव्य समजतो.

ही प्रबंधिका मी पूर्ण करू शकलो याचे सर्व श्रेय शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागातील माझ्या मार्गदर्शिका आदरणीय डॉ. सौ. वासंती प्रतापचंद्र रासम यांनाच दयावे लागेल. त्यांनी माझ्यावरील स्नेहामुळे मार्गदर्शन करण्यापासून ते ग्रंथसंपदा देण्यापर्यंत सहकार्य केले. शोधनिबंधाच्या कामासांठी सतत सहकार्य करून आनंदाने त्यांनी मला मार्गदर्शन केले आणि म्हणूनच हा शोधनिबंध मी पूर्ण करू शकलो. त्यांच्या ऋणातून मुक्त होणे शक्य नाही त्यामुळे जन्मभर त्यांच्या ऋणात रहाण्यातच मला आनंद वाटेल. श्री. प्रतापचंद्र रासम यांनीही वेळोवेळी खूप आधार दिला मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

राज्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. के. के. कावळेकर यांनी सतत प्रोत्साहन दिले तसेच डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. मेधा नानिवडेकर व श्रीमती भारती पाटील यांच्याशी वेळोवेळी केलेली चर्चा उपयुक्त ठरली मी त्यांचा ऋणी आहे.

कोल्हापूरपासून माझे गाव खूप दूर असून सुध्दा मला शिकण्याची सतत प्रेरणा देणारे तीर्थ. आबा ( वडील ), सौ. बाई(आई) आणि वडीलबंधू प्रा. सुधीर माने व सौ. कीर्ती वहिनी यांच्यामुळेच मी या शोधनिबंधाचे स्वप्न साकार करू शकलो. लहानबंधू ॲड. धैर्यशिल माने व पुतनी चि.पूर्वा, विवेकानंद जगताप (दाजी) यांनीही सतत प्रेरणा दिली आणि श्री. सदाशिवराव जगताप माजी सरपंच (वाशी) व त्यांचे सर्व कुटूंबिय व आजी यांनी मला कायमचेच ऋणात बांधून ठेवलेले आहे.

माझ्या शोधनिबंधासाठी माहिती मिळविण्यासाठी आणि विषय निवडल्यानंतर सतत प्रोत्साहन व सहकार्य देणारे भाई बळीराम चेडे (बापू) , प्रा. भरत जगताप, प्राचार्य

डॉ. विठ्ठलराव मोरे, प्रा. सूर्यकांत जगदाळे, ॲड. सूर्यकांत सांडसे, ॲड. घनःशाम रितापूरे, प्रा. श्री. व सौ. बापूसाहेब खैरे यांचे मी कधीही ऋण विसरू शकणार नाही. तसेच शाहू मोटे, ॲड. रवींद्र शिंगणापुरे, श्री. चंद्रकांत नाइकवाडी, श्री. वैभव घुले, श्री. सुरेश जोशी, श्री. राजेंद्र गपाट अँड. चंद्रकांत शिंदे, श्री. भास्कर भवर, प्रा. सुरेशराव शिंदे, प्रा. गुंडोपंत पाटील, प्रा. संभाजी शिंदे, प्रा. सुशिलकुमार शिंदे, श्री. धनंजय चेडे, श्री. सचिन सांडसे, श्री. दिलीप मोहिते अँड. चंद्रकांत शिंदे **प्रा. विक्रम पाटील,प्रा.राजाभाऊ पवार, साहेबराव पवार,** यांनी केलेले सहकार्य त्याबद्‌दल मी त्यांचा ऋणी आहे.

या शोधनिबंधासाठी ज्यांनी माझ्याशी चर्चा करून मुलाखती दिल्या त्यामध्ये औरंगाबाद खंडपीठाचे माजी न्या. व कै. नरसिंगराव देशमुख काटीकरांचे चिरंजीव बी. एन. देशमुख (तात्या) , ॲड. श्रीहरी लोमटे (कळंब) ॲड. सुखदेवराव शेळके (औरंगाबार), ॲड. राजेंद्र (अण्णा) देशमुख, श्री. सुरेशभाई तापडीया(दोघेही उस्मानाबाद) तसेच कै. उध्दवराव पाटीलांबद्‌दल माहिती मिळवून देण्यासाठी त्यांचे चिरंजीव श्री. धनंजय पाटील (अप्पा), उध्दवरावांचे चुलत भाऊ दिनकरराव पाटील व पुतणे प्रा. संदीप पाटील (इर्ले) सहकार्य केले याबद्‌दल मी त्यांचा ऋणी आहे. या शोधनिबंधाचे काम पूर्ण करताना शिवाजी विद्यापीठातील बॅ. खर्डेकर ग्रंथालय, कोल्हापूर याची खूपच मदल झाली. कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय ग्रंथालय वाशी, विशाल सहयाद्री ट्रस्ट पुणे (जनसत्ताचे अंक), अर्धसाप्ताहीक व दै. मराठवाडा (औरंगाबाद) या वृत्तपत्रांच्या संकलीत फाईल्स त्यांच्या ग्रंथालयात पाहाण्यास मिळाल्या. या ग्रंथालयातील प्रमुख व कर्मचा–यांच्या सहकार्याबाबत मी त्यांचा ऋणी आहे.

माझ्या अभ्यासास अत्यंत उपयोगी ठरणारे डॉ. भा. ल. भोळे यांचे पी. एच. डी चा शोधनिबंध मिळवून देणा–या ए.एस.सी. कॉलेज रामानंदनगर, येथील प्रा. सौ. एन. आर. रनखांबे आणि भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे मुखपत्र मासिक ' संग्राम ' उपलब्ध करून देणारे श्री. संजय गायकवाड यांचा मी ऋणी आहे. तसेच राज्यशास्त्र विभागाचे लेखनिक श्री. उत्कर्ष फडणीस, श्री. अरूण वणिरे व श्री. संभाजी तोरस्कर यांचे सहकार्य मिळाले त्यांचा मी ऋणी आहे.

कोल्हापूरच्या वास्तव्यात घराची आठवण कधीही येऊ दिली नाही असे श्री. व सौ. प्रमोद पोटे , यांचाही मी ऋणी आहे.

शोधनिबंधाच्या संगणक मुद्रणाचे कार्य श्री. अभिजीत देशपांडे व श्री. राहुल शिंदे यांनी अल्पवेळात पूर्ण करून दिले तसेच शोधनिबंधाचे कार्य पूर्ण करताना प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष नेते, शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते, अधिव्याख्याते, विद्यार्थीमित्र व सर्वज्ञात–अज्ञात मित्रांचा मी अत्यंत ऋणी आहे.

अभिमान मच्छींद्र माने

# प्रस्तावना

उस्मानाबाद जिल्हयातील ' शेतकरी कामगार पक्ष : एक अभ्यास ' हा विषय शोधनिबंधासाठी का निवडला त्याचे उत्तर प्रस्तावनेत नोंदविणे आवश्यक वाटते त्यामुळे माझ्या अभ्यास विषयाकडे पाहण्याची भूमिका स्पष्ट होऊ शकेल.

महाराष्ट्रात जोतीराव फुले, शाहू महाराजांनंतर बहुजन समाजाच्या चळवळीचे शे. का. पक्षाने धार पुढे रेटण्याचा प्रयत्न केला. अनेक विरोधी पक्षांनी, विचारवंतांनी, शे. का. पक्षाला या चळवळीला जातीवादी चळवळ म्हणून संबोधले असले तरी बहुजन समाजाच्या चळवळीचे वरिल मान्यवरांनंतरचे तेच वारसदार ठरू शकतात. उस्मानाबाद जिल्हयात शे. का. पक्षाच्या रूपाने उध्दवराव पाटील, नरसिंगराव देशमुखांनी बहुजनांच्या उध्दरासाठी चळवळीतील कार्य महत्वपूर्ण आहे. आणि उस्मानाबाद जिल्हयातील शे. का. पक्षावर यापूर्वी अभ्यास झालेला नव्हता.

ब्राह्मणेतरांनी संकुचित व स्वार्थी राजकारणाविरूध्द बंड पुकारून प्रथम कॉंग्रेस संघटनेत आलेल्या ब्राह्मणेतर नेत्यांनी १९४८ मध्ये प्रस्थापित सत्ताधारी कॉंग्रेस नेत्यासमोर शे. का. पक्षाच्या रूपाने आव्हान निर्माण केले. तसेच सत्यशोधकांच्या चळवळीला बळकटी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परंतु या चळवळीस जातीयवादी ठरविण्याचा प्रयत्न कॉंग्रेससह विरोधकांनी केला. हा आरोप शे. का. पक्षावर राजकीय स्वार्थासाठी परिवर्तन बाजूला सारून सोयीनुसार केला गेला. असे होणे अनेक जाती–वर्ण व्यवस्थेतील देशात अनिर्वाय वाटते. परंतु जातीवादी ठरलेला हा आरोप दुय्यम स्वरूपाचाच होता.

उस्मानाबाद जिल्हयातील शे. का. पक्षाने बहुजन समाजाची निर्माण केलेली चळवळ आणि त्यांना न्याय मिळवून देण्याचा केलेला प्रयत्न या त्यांच्या तळमळीतून आस्था निर्माण झाल्याने विषय निवडला. जिल्हयातील शे. का. पक्षाला कै. उध्दवराव पाटीलांचे मिळालेले नेतृत्व हे महत्वपूर्ण असून त्यांच्या नेतृत्वामुळे उस्मानाबाद

जिल्हयात शे. का. पक्षाला बळकटी निर्माण झाली. उध्दवराव पाटलांचे नेतृत्व १९८० पर्यंत उस्मानाबाद जिल्हयातील शे. का. पक्षाला खंबीर मिळाले असल्याने १९८० पर्यंतच्या कालखंडाचा अभ्यास शोधनिबंधात केलेला आहे.

कोणत्याही राजकीय पक्षाचा अभ्यास करताना त्या पक्षाचा वैचारिक आधार कोणता हा महत्वाचा मुद्दा असतो त्यादृष्टिने प्रस्तुत शोधनिबंधात उस्मानाबाद जिल्हयातील शेतकरी कामगार पक्षाचा अभ्यास करताना पक्ष कोणत्या कारणातून उदयास आला ? पक्षाची वैचारिकता कोणती ? हा अभ्यास महत्वपूर्ण ठरतो. उस्मानाबाद जिल्हा मराठवाडा या महाराष्ट्र राज्याच्या विभागात येत असल्याने मराठवाडयातील शे. का. पक्ष उदयास कसा आला ? पक्ष स्थापनेपूर्वीची सामाजिक, शैक्षणिक, राजकीय परिस्थिती निजाम राजवटीमध्ये कोणत्या प्रकारची होती आणि मराठवाडयात शे. का. पक्षाची स्थापना करण्यात आणि निजाम राजवटीत अन्याय राजवटीत अन्यायकारक परिस्थितीविरूध्द चळवळ निर्माण करण्यात उस्मानाबाद जिल्हयातील पुढा–यांचा वाटा महत्वपूर्ण होता. त्यामध्ये कै. उध्दवराव पाटील, कै. नरसिंगराव देशमुख काटीकर, ज्ञानेश्वर पाटील इत्यादी अग्रभागी होते त्यामुळे उस्मानाबाद जिल्हयातील शे. का. पक्षाची अभ्यास करत असताना मराठवाडयातील सामाजिक, राजकीय परिस्थितीचा आणि मराठवाडयातील शे. का. पक्षाच्या अभ्यासाची आवश्यकता वाटते.

बहुजन समाजाच्या चळवळीची जी जातीय प्रतिमा उभा राहिली होती ती पुसून काढण्यात आणि या चळवळीला क्रांतिकारी स्वरूप देणे शे. का. पक्षाला शक्य होते. बहुजन समाजाच्या चळवळीला समाजवादी स्वरूपाचे वळण देण्याची घोषणा पक्ष स्थापनेवेळी शे. का. पक्षाच्या पुढा–यांनी व्यक्त केलेली होती. शे. का. पक्षाला या कार्यात मराठवाडयात तथा उस्मानाबाद जिल्हयात सुरूवातील कितपत यश मिळाले आणि त्याचा निवडणुकीत कितपत यश मिळवून देण्यात उपयोग झाला हा अभ्यास महत्वपूर्ण ठरतो. या सुरूवातीच्या काळात त्यांचे शेतीविषयक, श्रमजीवी जनतेविषयी आणि महाराष्ट्रातील जनतेविषयी इतर सामाजिक, राजकीय प्रश्नांच्याही

संदर्भाविषयीच्या मुद्दयावर चळवळी निर्माण केल्या होता याचाही अभ्यास शोधनिबंधात करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

शे. का. पक्षाने १९६७ नंतर श्रमजीवी जनतेसाठी निर्माण केलेल्या चळवळी या नैसर्गिक आपत्ती, राजकीय, शैक्षणिक, सामाजिक परिस्थितीतून निर्माण झाल्या व या कार्यात त्यांना मिळालेले निवडणुकीतील यशापयशाची मराठवाडयातील आणि उस्मानाबाद जिल्हयातील मोजमाप, कारणमिमांसा करण्याचा प्रयत्न शोधनिबंधात केलेला आहे. उस्मानाबाद जिल्हयातील शे. का. पक्षाला उध्दवराव पाटलांचे मिळालेले खंबीर नेतृत्वाचा सर्वांगीण अभ्यास शोध निबंधात केलेला आहे.

या शोधनिबंधाच्या अभ्यासासाठी ऐतिहासिक पध्दतीचा व वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला. या पध्दतीत ऐतिहासिक कागदपत्रे, वृत्तपत्रे, शे. का. पक्षाची मासिके, साप्ताहिके, शे. का. पक्षाच्या नेत्यावरिल स्मरणिका, विशेषांक, शे. का. पक्षाच्या अधिवेशनातील ठराव, प्रत्यक्ष मुलाखती, ध्वनीमुद्रांकीत भाषणे, अप्रकाशित शोधनिबंध, शे. का. पक्षाच्या नेत्यांचे लेख, नेत्यांची विधानसभेतील भाषणे या साधनांचा वापर केलेला आहे. ग्रंथालयाचा आधार या अभ्यासास प्रमुख आहे.